# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ६५७२ /२०१७ पुणे शहर, दिनांक १९/०८/२०१७

**विषय :- मध्यवर्ती वाहतुक व्यवस्थापन केंद्राचे नुतन इमारतीचे उद्‌घाटन समारंभ पार पडले बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतुकीच्या समस्या सोडविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त मध्यवर्ती वाहतूक व्यवस्थापन केंद्राच्या इमारतीची आवश्यकत्ता होती, सदरचे केंद्र लोकसहभागातून बांधण्याकरीता अनेक कंपन्यांशी चर्चा करण्यात आली रोटरी क्लब व फोक्सवॅगन यांनी प्रस्तावास मान्यता दिली. फोक्सवॅगन कंपनीने सी.एस.आर.फंडातुन निधी मंजूर केल्यानंतर दिनांक- १९/१२/२०१६ रोजी मध्यवर्ती वाहतूक व्यवस्थापन केंद्राचे भुमीपुजन करण्यात आले होते सदरचे बांधकाम आठ महिन्यात पुर्ण करण्यात आले.

आज दिनांक- १९/०८/२०१७ रोजी, व्होक्सवॅगन इंडिया प्रा.लि. कंपनी व रोटरी क्लब ऑफ पुणे-बाणेर यांचे संयुक्त विद्यमाने बांधून देण्यात आलेल्या मध्यवर्ती वाहतुक व्यवस्थापन केंद्राच्या नुतन इमारतीचा उद्‌घाटन समारंभ मा. श्री. सतिश माथूर,पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे शुभहस्ते व मा. श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर व श्री. रविंद्र कदम,पोलीस सह आयुक्त,पुणे शहर, यांचे प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न झाला सदर कार्यक्रमास मा.श्री. अभय गाडगीळ,प्रांतपाल रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३१, श्री. जोशी, श्री. रिझवुड, डॉ. ॲंड्रीयास लौरेमन, मॅनेजींग डायरेक्टर, फोक्सवॅगन, यांचे वतीने टोरस्टन ट्रोक, श्रीमती भुवनेश्वरी, श्री. सुळे,श्री नाईक,सा.बां.वि. पुणे, श्री.लोंढे,पीडब्ल्युसी कंपनी,श्री.वैद्य(कॉन्ट्रक्टर), श्री.दाखवे,आर्किटेक, श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व अपर पोलीस आयुक्त परिमंडळीय पोलीस उपआयुक्त व अधिकारी,कर्मचारी यांचे उपस्थीत संपन्न झाला आहे. सदरच्या अद्ययावत सीसीटिव्ही कंट्रोलरुममुळे वाहतुक कोंडीची ठिकाणे सत्वर समजतील व त्या ठिकाणी कोंडी सोडविण्याठी तात्काळ उपाययोजना करता येतील तसेच गुन्हेगारी रोखण्यासाठीही सीसीटिव्हीच्या माध्यमातुन उपाययोजना करता येतील.

तसेच सीसीटिव्ही कारवाई बाबत जनजागृती करण्यासाठीची शॉर्टफिल्म तयार करण्यात आली असून सदरच्या शॉर्टफिल्ममध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी काम करुन सहभाग घेतला आहे.सदर शॉर्टफिल्मचे मा.पोलीस महासंचालक सो यांचे हस्ते अनावरण करण्यात आले आहे.सदरची फिल्म व इतर जनजागृती बाबतच्या फिल्म्स पुणे शहरातील प्रत्येक गणेश मंडळांना देण्यात येणार असून शहरातील सिनेमागृहातही दाखविण्यात येणार आहेत.

